पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. ९८ दि.१५/०१/२०२०

# प्रेसनोट

## पुणे शहरातील नागरिकांचे बनावट डेबिटकार्ड (कार्ड क्लोन) तयार करुन त्याआधारे नागरिकांचे बँक अकाऊंटमधील रक्कम चोरणारे ४ परप्रांतीय आरोपींना अटक, ६ गुन्हे उघडकीस

पुणे शहरामध्ये नागरिकांचे डेबिटकार्ड त्यांचेच ताब्यात असताना त्यांच्या डेबिटकार्ड वरुन ए.टी.एम.सेंटर मधुन रक्कम काढल्याबाबतच्या तक्रारी मागील १५ दिवसामध्ये जास्त प्रमाणात येवू लागल्याने सहा.पो.नि.श्री.गंगाधर घावटे, पो.हवा.अस्लम आत्तार, पो.शि. अनिल पुंडलिक यांनी प्राप्त तक्रारी अर्जांचे विश्लेषण करुन तक्रार देण्यासाठी आलेल्या नागरिकांनी पुणे कॅम्प परिसरातील एकाच पेट्रोल पंपावरुन पेट्रोल भरल्याचे निष्पन्न झाल्याने काल दि.१३/०१/२०२० रोजी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर कडील सहा.पो.नि.श्री.गंगाधर घावटे, पो.हवा.अस्लम आत्तार, पो.शि. अनिल पुंडलिक यांनी सदरच्या पेट्रोलपंपावर जावून चौकशी केली असता पेट्रोलपंपावर काम करणारे १) मिथुन अली पुत्र श्री जमशेद अली रा.गांव गौरीपुर पोस्ट-रसुलपुर थाना चांचला जि. मालदा पश्चिम बंगाल. २) नोयन शेख पुत्र श्री सादीक शेख रा.गांव गौरीपुर पोस्ट-रसुलपुर थांना चांचला जि. मालदा पश्चिम बंगाल, ३) सईमुद्दीन अली पुत्र श्री अता उर रहेमन रा.गांव गौरीपुर पोस्ट-रसुलपुर थांना चांचला जि. मालदा पश्चिम बंगाल हे तिघेही मागील ३ महिन्यापासुन कामावर असून एकत्रित राहणेस आहेत तसेच ते तिघेही एकाच गावातील राहणारे असल्याने त्यांचेबाबत संशय वाटल्याने त्यांचेकडे सखोल तपास करता त्यांनी जे नागरिक पेट्रोल भरल्यानंतर कार्डद्वारे पेमेंट करतात त्यांच्या कार्डाचा डेटा व पिन नंबर पेमेंटस्लिप वर लिहुन घेवून डेबिटकार्डची माहिती व पिन नंबर ते त्यांचा आणखीन एक साथीदार ४) जुल्फीकार अहमद पुत्र श्री. दुलाल हुसेन रा.गाव सिमला, पोस्ट महेंद्रपुर, थाना हरिश्चंद्रपुर जि.मालदा, पश्चिम बंगाल सध्या रा.वडगांवशेरी,पुणे यास देत असले बाबतची माहिती मिळाल्याने तात्काळ वरील तिघांना घेवून ते सर्व भाड्याने राहत असलेले सर्वे नं.४२ गणेशनगर, वडगांवशेरी, पुणे येथील रुमवर जावून जुल्फीकार अहमद दुलाल हुसेन यास ताब्यात घेवून या सर्व आरोपींविरुद्ध सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर गु.र.नं. ०३/२०२० भादवि कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३/६६, ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येवून त्यांना आज रोजी दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांची दिनांक - २४/०१/२०२० पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे.

अटक आरोपींकडे केले तपासात जुल्फीकार अहमद हा पुर्वी पेट्रोल पंपावर कामास असल्याने त्याने इतर आरोपींना पेट्रोलपंपावर काम देतो म्हणुन सुमारे ३ महिन्यापुर्वी पुणे शहरात घेवून आला व पेट्रोलपंपावर कामास लावले. आरोपी मिथुन अली, नोयन शेख, सईमुद्दीन अली हे पेट्रोलपंपावर काम करित असताना जे नागरिक पेट्रोल भरल्यानंतर कार्डद्वारे पेमेंट करतात, ते करित असताना ते त्यांचेकडील स्किमर(कार्ड रिडर) ओरिजिनल स्किमर सोबत धरुन कार्ड स्वॅपिंग करतात व ग्राहकांचे कार्डचा डेटा त्यांचेकडील स्किमर मध्ये कॉपी करुन घेतात तसेच ग्राहक जेव्हा पिन नंबर टाकतात तेव्हा ते पिन क्रमांक लक्षात ठेवतात व ग्राहकांना पेमेंट स्लिप न देता त्यावर पिनक्रमांक लिहुन ती स्लिप स्वतःजवळ ठेवतात व मिळालेली माहिती आरोपी जुल्फीकार अहमद याचेकडे देतात. त्यानंतर जुल्फीकार हा सदरची माहिती त्याचे दिल्ली येथील मित्र नामे १) गुड्डू व २) रोहीत पुर्ण नांव पत्ता नाही यांना देवून बनावट क्रेडिट कार्ड तयार करतात. तयार झालेल्या बनावट कार्डपैकी काही कार्ड आरोपींना त्यांचेसाठी रक्कम काढण्यासाठी दिली जातात

अटक आरोपींकडुन ७ मोबाईल हॅन्डसेट, २० बनावट डेबिट कार्ड, १२ ओरिजिनल वेगवेगळ्या बँकांचे डेबिट कार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड व रोख १२३०/-रु. असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीकडुन अशाच प्रकारचे आणखीन ६ गुन्हे उघडकीस आले असून आणखीन किती बनावट डेबिटकार्ड तयार करण्यात आले याबाबत तपास चालू असुन आरोपींचे फरार साथीदारांचा देखील शोध घेत आहोत.

सदरची कामगिरी श्री.अशोक मोराळे,अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर, श्री.संभाजी कदम, पोलीस उप-आयुक्त, आर्थीक व सायबर गुन्हे,पुणे शहर, श्री.शिवाजी पवार सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर घावटे, पोलीस कर्मचारी अस्लम आत्तार, मंगेश नांगरे, अनिल पुंडलिक, सौरभ घाटे, आदेश चलवादी, बाबासाहेब कराळे, आनंद भंडलकर यांनी केली आहे.

दाखल गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे,सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर हे करित आहेत.

नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, पेट्रोल पंपावर अगर कोठेही कार्डद्वारे पेमेंट करित असताना कार्ड स्वॅप करित असताना आपल्या कार्डाचा पिन क्रमांक कोणी पाहत नाही याची खात्री करावी तसेच प्रत्येक १-२ महिन्यामध्ये आपले सर्व कार्ड चे पिन क्रमांक चेंज करावेत.